महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११७ वा | दिनांक : ०१/०२/२०२५ | वार : शनिवार

## धनंजय मुंडे वाल्मीक कराडला वाचवत आहेत - भाजप नेते नरेंद्र पाटलांचा आरोप





**नाशिक :** भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी सकाळी पत्रकार परिषद घेत मंत्री धनंजय मुंडे यांची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे हे खंडणी प्रकरणात गुन्हेगार नाहीत हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो, असे ते यावेळी म्हणाले आहेत. यावरून अनेक नेत्यांनी आता प्रतिक्रिया देण्यास सुरू केले आहे. भाजप नेते व अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी धनंजय मुंडे यांना घरचा आहेर दिला आहे.

धनंजय मुंडे यांना पाटील म्हणाले, एवढे सर्व प्रकरण झालेले असताना धनंजय मुंडे हे कराडच्या परळी येथील कार्यालयात जाऊन गाठीभेटी घेत होते. याचा अर्थ धनंजय मुंडे हे वाल्मीक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. तसेच धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना नरेंद्र पाटील यांनी आमदार सुरेश धस तसेच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांचे समर्थन केले आहे. नरेंद्र पाटील म्हणाले, अंजली दमानिया आणि सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या दोघांचीही मागणी योग्य आहे. आपला सहकारी किंवा पार्टनर एखाद्या प्रकरणात अडकला असेल तर मुंडे यांनी लगेच बाजूला व्हायला हवे होते, असा सल्ला देखील नरेंद्र पाटील यांनी दिला आहे.

एवढ्या सगळ्या गोष्टी घडल्यानंतर देखील धनंजय मुंडे हे परळीमध्ये जाऊन कराडच्या कार्यालयात गाठीभेटी देत आहेत. याचा अर्थ मुंडे हे वाल्मीक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच अंजली दमानिया आणि सुरेश धस यांनी राजीनाम्याची केलेली मागणी अतिशय रास्त आहे, असेही नरेंद्र पाटील म्हणाले.

पुढे बोलताना नरेंद्र पाटील म्हणाले, धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यावर कुठलाही दबाव राहणार नाही. चौकशी चांगल्या पद्धतीने होईल. पारदर्शक होईल. तसेच या प्रकरणातील सत्यही बाहेर पडेल. सत्य बाहेर आल्यावर आणि निर्दोष असेल तर धनंजय मुंडे यांनी खुशाल परत मंत्रिपदाची शपथ घ्यावी. पहाटे, संध्याकाळी, सकाळी आणि दुपारी केव्हाही शपथविधी होतच असतो. त्यामुळे एका मंत्र्यासाठी पुन्हा शपथविधी होऊ शकतो, असा तोला नरेंद्र पाटील यांनी लगावला आहे.

चौकशीमध्ये जर धनंजय मुंडे यांच्या नावाचा उल्लेख होत असेल तर त्यांनी पदापासून अलिप्त राहावे. त्यांच्या राजीनाम्याने फायदा होईल की नुकसान होईल हे पाहू नये. कॅबिनेट मंत्र्यांचा हा जिल्हा आहे. तसेच त्यांच्या निकटवर्तीयांची चौकशी सुरू आहे. त्यामुळे पोलिस यंत्रणेवर दबाव आहे. पोलिसांच्या तक्रारीही येत आहेत. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी काही वेळासाठी अलिप्त राहिले पाहिजे. सरकार त्यांचेच आहे. अजितदादांनी एवढी मोठी पाठराखण केली आहे. एक दोन महिन्याचा प्रश्न आहे. एकदा का तपास पूर्ण झाला तर पुन्हा शपथविधी घ्या. कुणी अडवले आहे? असा सवाल नरेंद्र पाटील यांनी केला आहे.

नामदेव शास्त्री आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीवर बोलताना नरेंद्र पाटील म्हणाले, धनंजय मुंडे आणि महंत यांच्यात नेमकी काय चर्चा झाली आहे हे त्या दोघांनाच माहीत आहे. मात्र, महंत नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे यांना निर्दोष सिद्ध करून एक प्रकारी क्लीनचीट घरचा आहेर देताना नरेंद्र दिली आहे. कुणाला क्लीनचिट द्यायची आणि नाही हा महंतांचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण तपास यंत्रणा याचा तपास करतीलच, हा मला ठाम विश्वास आहे.

## महा कुंभमेळयातील मृतांची जबाबदारी पंतप्रधानांनी स्वीकारावी - डॉ. बाबा आढाव



**सातारा :** सध्या संपूर्ण देशामध्ये धर्मांधतेचे वातावरण पसरवण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून जाणीवपूर्वक केले जात आहे. प्रयागराज येथील महाकुंभ मेळाव्यात चेंगराचेंगरी मध्ये हजारो भाविक मृत्युमुखी पडले असावेत आणि तितकेच बेपत्ता झाले असावेत. पण शासन खरा आकडा जाहीर करत नाही आणि खरे आकडे समोर येऊ देत नाही. शासनाची व एकूणच प्रशासनाची यासंदर्भात बेपर्वाई दिसून येते. याप्रकरणी जबाबदारी स्वीकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत डॉ बाबा आढाव यांनी सातारा येथे बोलताना केली.

कोल्हापूरला जाताना आज (शुक्रवारी) सकाळी डॉ. बाबा आढाव हे रिक्षा पंचायतीचे सरचिटणीस साथी नितीन पवार व ओंकार मोरे यांच्या सह सातारा येथे थांबले होते. 94 व्या वर्षीही डॉ. बाबा आढाव यांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. सामाजिक परिस्थिती त्यांना अस्वस्थ करणारी आहे हे त्यांच्या बोलण्यातून जाणवत होते.

साताऱ्यातील फुले- शाहू - आंबेडकरवादी, परिवर्तनवादी कार्यकर्त्यां कडुन डॉ बाबा आढाव यांनी सध्याच्या राजकीय व सामाजिक स्थितीबद्दल माहिती घेतली. त्यावेळी डॉ. बाबा आढाव यांनी सांगितले की महा कुंभमेळा आणि तेथील चेंगराचेंगरी मध्ये बेपत्ता झालेले व मृत्युमुखी पडलेले यांची संख्या लक्षात घेता सरकारचा हलगर्जीपणा यात दिसून येतो. त्यामुळे सरकारने जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा दिला पाहिजे.

सध्याची देशातील सामाजिक परिस्थिती अस्वस्थ करणारी आहे. या संदर्भात तरुणाईनेच आता उचल खाल्ली पाहिजे. आणि संविधान टिकवले पाहिजे. आता निर्भय बनुन रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय नाही असेही डॉ बाबा आढाव म्हणाले. डॉ. बाबा आढाव यांनी सुरुवातीला महात्मा फुले यांचा, "सत्य सर्वांचे आदी घर, सर्व धर्मांचे माहेर" हा अखंड म्हटला व सर्वांनी त्यांच्या मागे सामूहिकपणे म्हटला.

यावेळी जयंत उथळे, मिनाज सय्यद, अरिफभाई बागवान, सुदामराव आवडे, शिरीष जंगम, दिलिप ससाणे, नारायण जावळीकर, प्रा. संजीव बोंडे, डॉ. राजश्री देशपांडे, नीलिमा देशपांडे, सलमा कुलकर्णी - मोरे, डॉ धनंजय देवी, राहुल गंगावणे, महेश गुरव, सलीम आत्तार, अॅड. विकास उथळे, डॉ. गीतांजली पोळ, अभिजित शिंदे वगैरे विविध संघटनांचे तसेच पुरोगामी विचाराचे कार्यकर्ते उपस्थित होते.

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ जानेवारी २०२५


## कन्नड येथे राष्ट्रीय राज्यस्तरीय खेळाडूंचा सत्कार




**कन्नड(अरुण थोरात):** राष्ट्रीय राज्य खेळाडूंचा कन्नड तालुका क्रीडा संकुल समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर खेळणार्या खेळाडूंना या क्षेत्रात अनेक संधी आहेत. खेळांमुळे आपला शारिरीक व मानसीक विकास होतो. खेळाडूं साठी शासनाच्या अनेक योजना आहेत. याचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थी, खेळाडूंनी घ्यावा असे अवाहन यावेळी मान्यवरांनी केले. यावेळी कन्नड तालुका क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष व आमदार संजना जाधव, उपविभागीय अधिकारी संतोष गोराड व उपविभागीय पोलीस अधिकारी विजय ठाकूरवाड, संकुल समितीचे कार्याध्यक्ष व तहसीलदार विद्याचरण कवडकर आदी विशेष आमंत्रण म्हणून उपस्थित होते.

ज्यांनी कन्नड तालुक्याचा मान उंचोला असे पहिले शिवछत्रपती पुरस्कार विजेते अभय कृष्णा शिंदे, गट विकास अधिकारी चंद्रहरी ढोकणे, तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य प्रवीण शिंदे, कन्नड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षण रंगराव सानप, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक डॉ रामचंद्र पवार यांची ही उपस्थिती लाभली. यावेळी राधाबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची राष्ट्रीय खेळाडू समृद्धी शिंदे व राष्ट्रीय खेळाडू तलवारबाजी रूपाली आनंद शिंदे, आयुष मोरे, थ्रो बॉलचा राज्यस्तरावर पात्र झालेला फातिमा शाळेच्या संघाचा सत्कार करण्यात आला. मुलीं मध्ये राज्यस्तरीय थ्रो बॉल मध्ये मुलींचा क्रिडा संघ मदर गंगा व देवगिरी हायस्कूल चा क्रिडा संघ, प्रोबल प्रशिक्षक विशाल दांडेकर, कल्याणी चव्हाण यांचा याचाही सत्कार करण्यात आला.

## मराठी भाषा संवर्धन आपली जबाबदारी : डॉ. दिलीप वाघ



**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे मराठी भाषा पंधरवाडा दिनानिमित्त विशेष व्याख्यान आयोजित केले होते. सिने अभिनेते डॉ दिलीप वाघ यांना महाविद्यायात प्रमुख अतिथी म्हणून पाचरण केले तेव्हा ते म्हणाले मराठी भाषा ही आपली ओळख आहे, आपली मातृभाषा आहे, माणसाला स्वप्न पडतात ते आपल्या मातृभाषेतून पडतात म्हणून ही भाषा जपने आपले आद्य कर्तव्य आहे, या भाषेचे संवर्धन करणे आपली जबाबदारी आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले अलीकडे मराठी भाषेत इंग्रजी भाषेचा अधिक भरणा झाला असल्यामुळे मूळ मराठी शब्दकोश बदलावा लागण्याची शक्यता दिसू लागली आहे, यासाठी आता मराठी भाषेचे वर्ग भरवावे लागते की काय अशी शंका त्यांनी निर्माण केली. या कार्यक्रमाचे संचलन डॉ. सुखदेव पोटदुखे यांनी केले तर आभार प्रा. अर्जुन चव्हाण यांनी मानले.

## महात्मा गांधी पुण्यतिथी साजरी तसेच विज्ञान प्रदर्शनातील विजेते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते)** वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) मध्ये आज दि. ३० रोजी जगद्गुरु जनार्दन स्वामी गुरुकुलात शिक्षण घेणाऱ्या मुलांची सेवा करण्यासाठी आपले आयुष्य अर्पण करणाऱ्या गोळेगावच्या आई तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे प्राचार्य श्री विजय बोरसे होते, तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक तथा पर्यवेक्षक श्री बी. के.अधाने व श्री बी. पी.बागडे हे होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आई या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच श्री अधाने गुरुजी व बागडे गुरुजी यांनी जीवनातील आईचे महत्व सांगून गोळेगावच्या आई यांनी केलेल्या कार्याची व राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या कार्याची माहिती दिली. तसेच यावेळी २६ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या अपूर्व विज्ञान प्रदर्शन मेळावा व विज्ञान रांगोळी स्पर्धेत सहभागी होऊन उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अपूर्व विज्ञान मेळावा प्रदर्शनात उच्च माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक प्रीतम दाबके, ऋषिकेश वेताळ, द्वितीय क्रमांक आदित्य रावते शुभम जाधव, ओमकार कदम तृतीय क्रमांक कु.कावेरी शेळके कु.साक्षी पांडव तर माध्यमिक गटातून विज्ञान प्रदर्शन प्रथम क्रमांक समाधान मगर, रितेश हिवर्डे, किरण हिवर्डे द्वितीय क्रमांक सार्थक मगर, तृतीय क्रमांक अभिषेक काळे तर विज्ञान रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.कोमल मोरे, कु.राजकिशोरी काळे, द्वितीय क्रमांक पवार रुद्र, कु.अनुराधा चव्हाण तर तृतीय क्रमांक कु.संजना इंगळे, कु.प्रगती गायके, कु.ईश्वरी बोडखे इत्यादी विद्यार्थ्यांना रायटिंग पॅड, स्केल, पेन इत्यादी साहित्य देऊन उपस्थित मान्यवर तसेच गुरुजनांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच विज्ञान प्रदर्शनासाठी मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती टिळेकर ताई , श्री भराडे गुरुजी , श्री भोसले गुरुजी, श्री रामटेके गुरुजी, श्रीमती सूर्यवंशी ताई यांचा पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्री राहाणे गुरुजी, श्री देव गुरुजी, श्री सूर्यवंशी गुरुजी, प्रा. कोटकर गुरुजी, प्रा. गुळवे गुरुजी, प्रा.रावते गुरुजी, प्रा.मालोदे गुरुजी श्रीमती सावंत ताई, श्री पवार गुरुजी, श्री रिठे गुरुजी, श्री खिल्लारे गुरुजी यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ जानेवारी २०२५


## राज्यपाल होऊन मी काय करू ? मी असा मोकळाच बरा - छगन भुजबळ



**मुंबई :** मी राज्यपाल होऊन काय करू? राज्यपाल होणे म्हणजे तोंडाला टाळे ठोकणे. त्यापेक्षा मी मोकळाच बरा, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे भुजबळांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्यापुढे राज्यसभेच्या सदस्यत्वासह राज्यपालपदी संधी देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

छगन भुजबळ सध्या राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे नाराज आहेत. त्यांनी आपली नाराजी अनेकदा उघडपणे बोलून दाखवली आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचेही संकेत दिलेत. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्यासाठी महायुतीकडून जोरकसपणे प्रयत्न केले जात आहेत. यासाठी महायुतीने त्यांच्यापुढे राज्यसभेचे सदस्यत्व किंवा राज्यपालपद स्वीकारण्याचा प्रस्ताव ठेवल्याचीही चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उपरोक्त विधान केले आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, मला राज्यपाल करणे म्हणजे माझ्या तोंडाला टाळे ठोकणे. मी राज्यपाल होऊन काय करू? माझे काम गोरगरिबांच्या अडअडचणी सोडवण्याचे आहे. त्यांच्यासाठी भांडण करण्याचे आहे. राज्यपाल होऊन मी त्या समस्या किंवा अडीअडचणी सोडवू शकणार आहे का? माझी राज्यपालपदाचा अपमान करण्याची इच्छा नाही. पण मी असा मोकळाच ठीक आहे.

लोकसभा निवडणुकीवेळी पक्षश्रेष्ठींकडून मला नाशिक येथून तयार करण्यास सांगण्यात आले होते. पण महिना लोटला तरी माझ्या नावाची घोषणा झाली नाही. त्यामुळे मी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर राज्यसभा आली. तेव्हा मी राज्यसभेवर जाण्याचा आग्रह धरला. पण पक्षाने सुनेत्रा पवार यांना संधी दिली. त्यानंतर दुसरी राज्यसभा आली. तेव्हा नितीन पाटील यांना करायचे ठरले. खरे सांगायचे तर मी त्या व्यक्तीला ओळखतही नाही.

छगन भुजबळ यांनी यावेळी मनोज जरांगे यांच्या फॅक्टरमुळे आपली लीड कमी झाल्याचेही मान्य केले. विधानसभा निवडणुकीत जरांगे पॅटर्न आला. पण जरांगे कुठेच आले नाहीत. ते येवल्यात आले आणि लीड कमी झाले. मी ६० हजारांनी निवडून आलो. त्यानंतर मला पक्षश्रेष्ठींनी विधानसभेचा राजीनामा देण्याची सूचना केली गेली. पण मी माझ्या लोकांना वाऱ्यावर कसे सोडणार? मला वाटले माझे नाव मंत्रिपदासाठी येईल. कारण, मी पक्षाच्या स्थापनेपासून पक्षासोबत आहे. अजित पवारांना पहिला पाठिंबा देणाराही मीच होतो. अजित पवारांचे नेतृत्व चांगले आहे. पण मानसन्मानाला धक्का लागला तर ते अजिबात योग्य नाही, असे भुजबळ म्हणाले.

दुसरीकडे, एकेठिकाणी बोलताना छगन भुजबळ यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी नव्हे तर हाल - हाल करून मारण्याची मागणी केली. संतोष देशमुख यांना अत्यंत अमानुषपणे मारण्यात आले. राक्षसही अशी कृती करणार नाही. परभणीच्या प्रकरणात पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी यांना ठार मारले. ते मराठा होते की दलित होते हा प्रश्न नाही. ते दोघेही माणसे होती. त्यांना कशा पद्धतीने तुम्ही मारले. सर्वच घटकांनी त्याचा निषेध केला पाहिजे व लढायला पाहिजे. या प्रकरणी एखादा या समाजाचा आहे म्हणून हे करा व तो दुसऱ्या समाजाचा आहे म्हणून विरोध करा हे मला काही पटत नाही. दुसऱ्या समाजावर हल्ला करणे हे काही बरोबर नाही. दुसऱ्या समाजावर ठपका ठेवणेही बरोबर नाही. तुमच्या दु:खामध्ये व रागामध्ये मी सुद्धा सहभागी आहे. त्यांना फासावर नाही असे हाल हाल करून मारा, असे ते म्हणालेत.

## लाँगमार्चमध्ये प्रशासनाने केलेल्या सहकार्याबाबत आंबेडकरवादी संघटना कडुन मुकनायक ग्रंथ मा. पोलीस आयुक्तांना देऊन मानले आभार



**छत्रपती संभाजीनगर :** संविधान शिल्पाच्या विटंबने नंतर परभणी येथे शहीद झालेले भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी व विजयदादा वाकोडे,बिड येथे निघ्रुन हत्या झालेले सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळावा म्हणुन आपल्या न्याय हक्कांसाठी संवैधानिक मार्गाने सुरु असलेल्या परभणी ते मुंबई लाँगमार्च २७ जानेवारी रोजी आपल्या छत्रपती संभाजीनगर शहरात दाखल झाला होता. हजारों भिमसैनिकांनी या ऐतिहासिक लाँमार्चमध्ये सहभागी होत. शिस्त व संयमाने पार पडला होता.कँब्रिज चौक ते बुध्दलेणी व २८ जानेवारीला बुध्दलेणी ते तिसगाव पर्यत अत्यंत संयमाने हा लाँगमार्च यशस्वी करण्यासाठी धम्मभुमी बुध्दलेणी येथिल पुज्यनिय भिख्खु संघ व सर्व पक्षिय आंबेडकरवादी पक्ष संघटना, आंबेडकरवादी बहुजन विकास समिती संपूर्ण लाँगमार्च यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले होते. अनेक सामाजिक संघटनांनी विविध ठिकाणी स्वागत स्टॉल लावुन या लाँगमार्च मध्ये सामिल माता भगिनीना व भिमसैनिकांना अत्यावश्यक व जिवनाश्यक वस्तुंची मदत केली होती. परंतु याच बरोबरच पोलिस प्रशासनाकडुन हा लाँगमार्च शांततेत यशस्वी करण्यासाठी संपूर्ण पोलीस बंदोबस्त व शहरात वाहतुकिचे योग्य नियोजन केले होते,यामुळे कुठल्याही प्रकारचे गालबोट या ऐतिहासिक लाँगमार्चला न लागता अतिशय शांततेत हा लाँगमार्च यशस्वी झाला.

तसेच पोलिस प्रशासनाप्रति सामान्य जनतेला नेहमी आदर व विश्वास रहावा असे कार्य नियोजन छत्रपती संभाजीनगर पोलीस प्रशासनाकडुन करण्यात आले होते.यामुळे अतिशय शांततेत व शिस्तित हा लाँगमार्च यशस्वी झाला.पोलिस प्रशासनाकडुन करण्यात आलेल्या सहकार्या बद्दल आज पुज्यनिय भिख्खु संघ व आंबेडकरवादी बहुजन विकास समितीच्या वतीने आज शहराचे कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्त मा. प्रविणजी पवार साहेब व शहराचे कर्तव्यदक्ष पोलीस उपआयुक्त मा. नितिनजी बगाटे साहेब यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.तसेच आज विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुकनायक या पाक्षिक वृत्तपत्राला आज १०५ वर्ष पुर्ण झाली वर्धापण दिना निमित्ताने त्यांना बाबासाहेबांनी लिहलेल्या मुकनायक ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला.व मुकनायकचा वर्धापण दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भंते बोधिधम्मो व पुज्यनिय भिख्खु संघ तसेच आंबेडकरवादी बहुजन विकास समितीचे अध्यक्ष-दिपक निकाळजे, अमित वाहुळ, प्रांतोश वाघमारे, सचिन जोगदंडे, सिध्दार्थ दाभाडे, कमलेश नरवडे, संतोष चव्हाण, निखिल निकाळजे, दिपक गवळी, शुभम बनकर व आदी आंबेडकरी संघटनांचे प्रतिनिधि कार्यकर्ते उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ जानेवारी २०२५




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विभागीय केंद्रातील कर्मचारी योगेश निमसे यांची नाशिक मुख्यालय येथे परीक्षा विभागात बदली झाल्याने त्यांना विभागीय कार्यालयातर्फे सत्कार करून निरोप देण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भराड, विभागीय संचालक डॉ. रमेश शेकोकार, कर्मचारी अनिल निपळुंगे, रविंद्र काटे आणि हर्षल अहिरराव, सुदाम गोराडे यांची उपस्थिती होती.

## विभागीय क्रीडा संकुल प्रवेशासाठी डिजीटल पडताळणी पद्धतीचा अवलंब करा - पालकमंत्री संजय शिरसाट यांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर :** विभागीय क्रीडा संकुलात अनधिकृत व्यक्तिंचा प्रवेश रोखण्यासाठी डिजीटल पद्धतीने चेहरा ओळखीची पद्धत अवलंबावी. तसेच ६० वर्षे व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या व्यक्तिंना विभागीय क्रीडा संकुलात चालण्याच्या व्यायामासाठी वार्षिक १०० रुपये इतके नाममात्र शुल्क आकारावे. जे केवळ त्यांच्या नोंदणीसाठीच्या प्रक्रियेकरीता वापरले जावे,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले.

विभागीय क्रीडा संकुल समितीची बैठक आज विभागीय क्रीडा संकुलात पार पडली. विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई तसेच विभागीय क्रीडासंकूल समितीचे सदस्य उपस्थित होते.पालकमंत्री शिरसाट यांनी आढावा घेऊन माहिती जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी सांगितले की, विभागीय क्रीडा संकुलाच्या मैदानावर व विविध क्रीडा प्रकारांच्या विशेष मैदानावर सराव करण्यासाठी व नियमित व्यायामासाठी येणाऱ्या खेळाडू व नागरिकांनाच प्रवेश देण्यात यावा. अन्य अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश रोखण्यासाठी डिजिटल पद्धतीने चेहरा ओळख ही पद्धत अवलंबावी. बालेवाडी येथील क्रीडा संकुलात ‘खेलो मोअर’ ही पद्धत वापरली जाते त्याप्रमाणे अत्याधुनिक पद्धती वापरावी. प्रत्येक क्रीडा प्रकार, इनडोअर आऊटडोअर या सेवांसाठी वेगळे दर निर्धारित केले जावे. तसेच ज्यांचे वय ६० वर्षापेक्षा अधिक आहे असे केवळ प्रकृतीस्वास्थ्यासाठी सकाळी वा सायंकाळी चालण्यासाठी मैदानात येतात अशा नागरिकांना नाममात्र रजिस्ट्रेशन करीता शुल्क आकारावे. वय वर्षे १८ ते ६० या व्यक्तिंकरीताच शुल्क आकारावे.

शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना शुल्क आकारु नये,असे निर्देश पालकमंत्री शिरसाट यांनी दिले. प्रत्येक व्यक्ती खेळाडुची डिजीटल नोंदणी करावी. त्यांच्या चेहऱ्याचे स्कॅनिंग करुन ओळख पटविण्याची यंत्रणा बसवावी. अंधारलेल्या भागात उजेडाची व्यवस्था करावी. सुरक्षा रक्षक नेमण्यासाठी सैनिक कल्याण कार्यालयामार्फत माजी सैनिकांची नेमणूक करावी. अवैध व्यक्तिंचा प्रवेश रोखण्यासाठी कडक उपाययोजना करावी. प्रत्येक खेळासाठी प्रशिक्षक म्हणून सेवा देणाऱ्या व्यक्ति म्हणून राष्ट्रीय पातळीवरील खेळाडुंनाच मान्यता द्यावी. तसेच सिंथेटीक धावनपथ तयार करण्याचे कामाबाबत कायदेशीरबाबी तपासून त्वरीत निर्णय घ्यावा. दोन लक्ष लिटरची भुमिगत पाण्याची टाकी बांधण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश पालकमंत्री शिरसाट यांनी दिले.

## महंत नामदेव शास्त्रींच्या वक्तव्यावर धनंजय देशमुखांचा संताप

**बीड :** राज्याचे अन्नपुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी भगवानगडावर भगवानबाबाचे दर्शन घेतले होते व त्यानंतर त्यांनी भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांची भेट देखील घेतली. आज सकाळी नामदेव शास्त्री यांनी पत्रकार परिषद घेत धनंजय मुंडे यांच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे असल्याचे म्हंटले आहे. तसेच संतोष देशमुख यांनी आरोपींना आधी चापट मारली होती, त्यानंतर हे सगळे घडले, असेही शास्त्री म्हणाले. यावर धनंजय देशमुख यांनी संताप व्यक्त केला आहे.

महंत नामदेव शास्त्री म्हणाले, धनंजय मुंडे हे खंडणी प्रकरणात गुन्हेगार नाहीत हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो. तसेच यावेळी शास्त्री म्हणाले की संतोष देशमुख यांनी आरोपींना आधी चापट मारली त्यानंतर हे सगळे घडले आहे. त्यामुळे आरोपींच्या मानसिकतेचाही विचार करायला हवा, असे शास्त्री म्हणाले. त्यांच्या या विधानावर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी संताप व्यक्त केला आहे.

धनंजय देशमुख म्हणाले, ज्या आरोपीला संतोष देशमुख यांनी चापट मारली, त्या चापट मारलेल्या आरोपीवर २२ गुन्हे आहेत. एक चापट मारली म्हणून त्यांनी एवढा भीषण खून केला. एका चापटेच्या बदल्यात त्यांनी १० चापट मारल्या असत्या तरी चालले असते, असे धनंजय देशमुख म्हणाले. पुढे ते म्हणाले, एक चापट मारली म्हणून त्यांची मानसिकता काय झाली असेल असे तुम्ही म्हणता, मग आज आमची मानसिकता काय झाली असेल हे समाज बघतोय, सगळे लोक बघत आहेत, त्याचेही उत्तर दिले पाहिजे, असे म्हणत धनंजय देशमुख यांनी संताप व्यक्त केला आहे.

पुढे बोलताना धनंजय देशमुख म्हणाले, एका चापटीच्या बदल्यात खून करायची मानसिकता तुमची असेल तर तुम्ही समाजाचं देणं लागत नाहीत हे स्पष्ट झालंय. पण, अशी जर मानसिकता कोणी केली तर दिवसा मुडदे पडतील, असे म्हणत त्यांनी त्यांच्या शास्त्रींच्या विधानाचा तीव्र विरोध केला आहे. तसेच या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा जातीय संघर्ष नसून १८ पगड जातीचे लोक संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात न्याय मागण्यासाठी लढत आहेत. त्यामुळे, हा जातीय संघर्ष नसून ही विकृती असल्याचेही धनंजय देशमुख म्हणाले.

## बीडमध्ये वाळू माफियांना सहकार्य करणाऱ्या पोलिसांना झटका



**बीड :** बीडचे नवनियुक्त पोलिस अधीक्षक नवनीत कांवत हे चांगलेच ॲक्शन मोडमध्ये आल्याचे दिसत आहे. अवैध वाळू उपसा केल्या प्रकरणी आरोपींशी साटे लोटे करणाऱ्या बीडच्या गेवराई पोलिस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणातील अधिकची माहिती अशी की, सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे यांना वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर कारवाईचे आदेश देण्यात आले होते तसेच वाळूसह गाडी देखील ताब्यात घेण्यास सांगितले होते. मात्र, यांनी वाळूसह गाडी ताब्यात न घेता केवळ वाहन ठाण्यात आणून लावले. तसेच गुन्हा दाखल करण्यास देखील विलंब केला. हा प्रकार म्हणजे आरोपींना सहकार्य करण्याचा होता. यामुळे पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी बलराम सुतार आणि अशोक हंबर्डे या दोन्ही कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

बीड येथील मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. या घटनेचे तीव्र पडसाद महाराष्ट्रात उमटू लागले. या दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यातील पोलिस अधीक्षकांची बदली करत नवनीत कांवत यांची बीडच्या पोलिस अधीक्षक पदावर नियुक्ती केली.

बीडमध्ये अवैध वाळू, राख तसेच खंडणी असे अनेक गुन्हे उघडकीस येत आहेत. त्यातच वाळू माफियाचा मुद्दा चांगलाच चर्चेत असताना अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांना दोन पोलिस कर्मचाऱ्यांना सहकार्य केल्याचे निदर्शनास आल्यावर पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002